# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 3 री

**प्र. 1. (अ)**

(1) 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा फ्रेडरिक मॅक्सम्युलर यांनी जर्मन भाषेत अनुवाद केला.

(2) महाबळेश्वरजवळील भिलार हे 'पुस्तकांचे गाव' म्हणून प्रसिद्ध आहे.

(3) 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' या वास्तूला मुंबई शहरातील 'पहिल्या प्रतीची सांस्कृतिक वारसा इमारत' असा दर्जा देण्यात आला आहे.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**

(1) भारतीय चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवून देणारा पहिला चित्रपट – संत ज्ञानेश्वर.

(2) बुद्धिबळ – मैदानी खेळ.

(3) जगाचा नकाशा व पृथ्वीगोल बनवणारा पहिला आरेखक – थॉमस कुक.

**प्र. 2. (अ)**

**(1)** **जागतिक वारसा स्थळांतील महाराष्ट्रातील ठिकाणे**

- घारापुरीची लेणी
- अजिंठ्याची लेणी
- वेरूळची लेणी व कैलास मंदिर
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई
- पश्चिम घाटावरील साताऱ्याजवळील कास पठार

**(2)** **खेळांच्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा**

- ऑलिम्पिक व विम्बल्डन
- एशियाड गेम्स
- क्रिकेट विश्वचषक स्पर्धा
- फुटबॉल विश्वचषक स्पर्धा

**(3)** **कोशांचे प्रकार**

- शब्दकोश
- विश्वकोश
- कोशसदृश वाङ्मय
- सूची वाङ्मय

**प्र. 2. (ब)**

**(1) प्राच्यवादी इतिहासलेखन :**

(१) अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपातील अभ्यासकांमध्ये पूर्वेकडील संस्कृती आणि देश यांच्याबद्दल कुतूहल निर्माण झाले होते. या कुतूहलापोटी भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना 'प्राच्यवादी अभ्यासक' असे म्हणतात.

(२) या प्राच्यवादी अभ्यासकांनी भारतीय संस्कृती, इतिहास, येथील विविध भाषा व धर्म यांचा अभ्यास करून इतिहासलेखन केले. या लेखनाला 'प्राच्यवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

(३) प्राच्यवादी अभ्यासकांनी संस्कृत आणि युरोपीय भाषांमधील साधर्म्यांचा अभ्यास करून 'या भाषांची जननी प्राचीन इंडो-युरोपीय भाषा होती,' अशी कल्पना मांडली.

(४) या प्राच्यवादी अभ्यासकांत छुपी साम्राज्यवादी वृत्ती दडलेली असल्याने त्यांनी पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन ठेवूनच भारताच्या इतिहासाचे लेखन केले.

**(2) हेमाडपंती शैली :**

प्रामुख्याने बाराव्या-तेराव्या शतकात यादवकाळात महाराष्ट्रात हेमाडपंती मंदिरांची बांधणी झाली.

(१) हेमाडपंती स्थापत्यशैलीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीत दोन दगडांमधील सांधे चुन्याने वा मातीने भरले जात नाहीत. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंती उभारल्या जातात.

(२) हेमाडपंती मंदिरांच्या बांधणीत प्रामुख्याने तारकाकृती बांधकाम आढळते.

(३) तारकाकृती मंदिरांच्या बाह्य भिंती अनेक कोनांमध्ये विभागलेल्या असतात.

(४) या दगडी भिंतींवरील देवतांची कोरीव शिल्पे पर्यटकांना आकर्षून घेतात. महाराष्ट्रभर अशी उभी असलेली हेमाडपंती शैलीतील मंदिरे तत्कालीन शिल्प व स्थापत्यकलेचा विकास दर्शवतात.

**(3) वर्तमानपत्रांची उद्दिष्टे :**

वर्तमानपत्रांची पुढील प्रमुख उद्दिष्टे असतात :

(१) स्थानिक, देशांतर्गत आणि जागतिक स्वरूपाच्या दैनंदिन घडामोडी लोकांपर्यंत पोहोचवणे.

(२) देशाचा राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक इतिहास सांगणे.

(३) लोकशिक्षण आणि लोकजागृती करून लोकशाहीला बळकट करणे.

(४) समाजातील अयोग्य घटनांचा निषेध करणे व समाजातील दुर्बल घटकांची बाजू समाजासमोर मांडणे.

**प्र. 3.**

**(1)** (१) इंग्रजी शिक्षणाने भारतीयांत निर्माण झालेल्या आत्मजाणिवेने राष्ट्रवादी इतिहासलेखनास प्रवृत्त केले.

(२) ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या भारताच्या पूर्वग्रहदूषित इतिहासाला भारताच्या विविध प्रांतांतील इतिहासलेखकांनी विरोध केला.

(३) आपल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांकडे इतिहासकारांचे लक्ष वेधले गेले.

(४) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रभाव होताच. त्यातूनच प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

**(2)** (१) दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम असल्याने ऐकत असलेल्या माहितीबरोबरच त्यासंबंधीची चलत्चित्रे प्रेक्षकांना प्रत्यक्ष पाहायला मिळतात. दूरदर्शन म्हणजे मनोरंजनाचा खजिनाच होय.

(२) सामाजिक समस्या, शैक्षणिक, आर्थिक चर्चा, राजकीय घडामोडी, चित्रपट, खेळ अशा जगातील सर्व घडामोडी दूरदर्शनच्या छोट्या पडद्यावर घरच्या घरी बसून पाहायला मिळतात.

(३) खेळाडू, नेते, किल्ले, युद्ध इत्यादी गोष्टींवरील माहितीपट दूरदर्शनवर पाहायला मिळतात.

(४) रंगीत संच, रिमोटचा वापर, घटनांचे सजीव दृश्यरूप व प्रत्यक्ष प्रसारण, बातम्या यांमुळे दूरदर्शनच्या लोकप्रियतेत वाढ झाली आहे. म्हणून सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन हे अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

**(3)** (१) खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य घटक आहे. व्यक्तीच्या खेळांची सुरुवात शालेय पातळीवरच होते.

(२) आंतरशालेय पातळीवर अनेक खेळ खेळले जातात. या खेळाडूंना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळते.

(३) सरकारी व खाजगी पातळीवरून खेळांना उत्तेजन मिळते, त्यांच्यासाठी तेथे राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

(४) खेळाडूंसाठी शिष्यवृत्त्याही ठेवण्यात आल्या आहेत. भावी जीवनात यशस्वी झालेल्या खेळाडूंचा पाया शालेय व महाविद्यालयीन पातळीवर तयार होत असतो.

**(4)** (१) प्राचीन दस्तऐवज, कागदपत्रे, अभिलेखागारांमध्ये ठेवण्यात येतात.

(२) या कागदपत्रांचे जतन करणे हे अभिलेखागारांचे काम असते.

(३) अभिलेखागारांमध्ये ठेवलेल्या कागदपत्रांत कोणताही बदल केला जात नाही.

(४) ही कागदपत्रे सुरक्षित ठेवणे व त्यांत कोणताही बदल न करता ती शासनाला किंवा अधिकृत व्यक्तींना हवी तेव्हा उपलब्ध करून देणे, हे अभिलेखागार व्यवस्थापनाचे काम असते.

त्यामुळे अभिलेखागारात ठेवलेली कागदपत्रे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत विश्वासार्ह मानली जातात.

## प्र. 4.

**(1)** ऐतिहासिक पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करणाऱ्या लेखनपद्धतीला 'इतिहासलेखन' असे म्हटले जाते.

**(2)** **इतिहासकाराची लेखनशैली निश्चित करणारे घटक**

↓ इतिहासलेखनासाठी निवडलेल्या घटना

↓ इतिहासकाराचा वैचारिक दृष्टिकोन

**(3)** प्राचीन काळात इतिहासलेखनाची वा घटनांची नोंद करण्याची पद्धत जगभरातच नव्हती; परंतु पुढील वेगवेगळ्या पद्धतीने भूतकालीन स्मृतींचे जतन केले जात असे :

(१) वडीलधाऱ्या व्यक्तींकडून पूर्वजांच्या पराक्रमाच्या ऐकलेल्या गोष्टी पुढील पिढीला सांगणे.

(२) गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन करणे.

(३) कहाण्यांचे कथन करणे.

(४) गीत व पोवाड्यांचे गायन करून स्मृतींचे जतन करणे.

## प्र. 5.

**(1)** 'लोककला' आणि 'अभिजात कला' या दोन कलांच्या परंपरांमधील फरक :

| | लोककला | अभिजात कला |
|---|---|---|
| १. | लोककला ही अश्मयुगीन काळापासून अखंडितपणे चालत आलेली परंपरा आहे. | अभिजात कलांची परंपरा एवढी प्रदीर्घ नाही. |
| २. | लोककलांचा आविष्कार हा लोकांच्या रोजच्या जगण्याचा भाग असतो. | अभिजात कला या लोकांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित नसतात. |
| ३. | लोककला या कोणत्याही नियमांनी बांधलेल्या नसतात. | अभिजात कला या प्रमाणित नियमांच्या चौकटींत बांधलेल्या असतात. |

| | लोककला | अभिजात कला |
|---|---|---|
| ४. | लोककलेची निर्मिती लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून होते व ती उत्स्फूर्त असते. | अभिजात कला आत्मसात करण्यासाठी दीर्घकालीन प्रशिक्षणाची आवश्यकता असते. |
| ५. | स्थानिक परिसर, परंपरा, पूजा पद्धती यांचा प्रभाव लोककलांवर पडलेला असतो. | अभिजात कलांवर स्थानिक परंपरांचा प्रभाव कमी असतो. |
| ६. | विविध लोकसमूहांत विविध प्रकारच्या लोककला आढळून येतात. | नियमांच्या चौकटींमुळे अभिजात कलांमध्ये विशिष्ट घराणी, पद्धती वा शैली निर्माण होतात. |

**(टीप :** *फरकाचे किमान कोणतेही तीन मुद्दे उत्तरात लिहिणे आवश्यक आहे.***)**

**(2)** (१) घडलेल्या प्रसंगातील नाट्य किंवा वीर पुरुषांच्या गुणांचे स्तुतीपर वर्णन करणारी वीररसयुक्त रचना म्हणजे 'पोवाडा' होय.

(२) पोवाडा हा गद्य-पद्यमिश्रित सादरीकरणाचा प्रकार आहे.

(३) तो पूर्वी राजदरबारात वा लोकसमूहासमोर आवेशपूर्णरीत्या डफाच्या तालावर सादर केला जात असे.

(४) पोवाड्यातून तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय स्थितीचे, सामाजिक रीतिरिवाजांचे वर्णन केलेले असते.

(५) लोकजागृती आणि मनोरंजन हा पोवाड्यांचा मुख्य हेतू असतो.

(६) पोवाड्यात दरबारी प्रथा, युद्धांच्या पद्धती, शस्त्रांची नावे यांचे उल्लेख असतात, म्हणून पोवाडा हा इतिहासलेखनाचे उपयुक्त साधनही आहे.

**(3)** ऐतिहासिक वास्तू या प्राचीन इतिहासाची साधने असून तो आपला सांस्कृतिक ठेवा आहे; म्हणून त्यांचे जतन आपण केले पाहिजे. त्यासाठी पुढील उपाय केले पाहिजेत –

(१) किल्ले, लेणी इत्यादी वास्तूंत खडकांतून झिरपणाऱ्या पाण्याचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. वास्तूंवर वाढणारी झाडे-झुडपे वेळीच समूळ नष्ट करावीत.

(२) उष्णता-दमट हवा यांमुळे वास्तूंची हानी होते. नवीन तंत्रज्ञान वापरून ही हानी टाळावी.

(३) समुद्रात किंवा समुद्रालगत असणाऱ्या प्राचीन वास्तूंची खाऱ्या पाण्यामुळे व हवेमुळे होणारी हानी टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

(४) पर्यटकांनी या वास्तू कशा स्वच्छ राहतील, याची काळजी घ्यावी. वास्तूंवर नावे कोरणे, त्यांची नासधूस करणे असल्या गोष्टी टाळाव्यात.

(५) मानवी विध्वंसनापासून वास्तूंचे जतन होण्यासाठी शासनाने कडक कायदे करावेत.

(६) ऐतिहासिक वास्तूंचे जतन का करायचे, याबाबत नागरिकांचे प्रबोधन करणेही आवश्यक आहे.

**(4)** (१) हे चित्र वेरूळ लेण्यांतील कैलास मंदिराचे आहे.

(२) हे लेणे भव्य असून कोरीवकामाचा उत्तम नमुना आहे.

(३) राष्ट्रकूट राजांच्या काळात हे लेणे कोरले गेले. एका अखंड दगडात वरून खाली अशा पद्धतीने हे लेणे कोरलेले आहे.

(४) हे लेणे द्राविड स्थापत्यशैलीत कोरलेले आहे.

(५) चित्रात मंदिरासमोर हत्तीचे शिल्प आहे, शिवाय एक कोरीव स्तंभ आहे.

(६) महाराष्ट्रातील या जगप्रसिद्ध लेण्याला युनेस्कोने १९८३ साली जागतिक वारशाचा दर्जा दिला आहे.

**प्र. 6.**

**(1)** ७३ व्या व ७४ व्या संविधान दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांना संविधानाची मान्यता मिळून त्यांच्या अधिकारात वाढ झाली आहे.

**(2)** स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकाराव्यात, अशी शेतकरी चळवळीतील प्रमुख मागणी आहे.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण—

(१) आचारसंहिता लागू केल्यामुळे निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकारांना आळा घालता येतो.

(३) धाकदपटशा, दहशत यांपासून सामान्य मतदाराला दिलासा मिळून तो मुक्त वातावरणात मतदान करू शकतो; म्हणून निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करतो.

**(2)** हे विधान बरोबर आहे; कारण—

(१) समाजातील काही व्यक्ती एकत्र येऊनच राजकीय पक्ष स्थापन करतात; म्हणजेच राजकीय पक्ष हे समाजाचेच अविभाज्य घटक असतात.

(२) जनतेच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात.

(३) त्या त्या समाजाची भूमिका, विचारसरणी घेऊन राजकीय पक्ष समाजात कार्य करीत असतात; म्हणून राजकीय पक्ष हे एक प्रकारे सामाजिक संघटनाच असतात.

**(3)** हे विधान चूक आहे; कारण —

(१) लोकशाहीत बहुमताने चालणारे सरकार असले; तरी सर्व जनतेचे कल्याण करणे, हा लोकशाहीचा उद्देश असतो.

(२) लोकशाहीत बहुसंख्याक असलेल्यांचेच सरकार असू नये, शासनात सर्वांच्या मतांना महत्त्व असायला हवे.

(३) लोकशाही शासनात सर्वांच्या हितासाठी, सर्व धर्मीय, सर्व भाषिक व जातीय गटांना सरकारने निर्णय प्रक्रियेत सामावून घ्यायला हवे; म्हणून अल्पमतात असणाऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी त्यांचेही मत विचारात घ्यायला हवे.

**प्र. 8. (अ)**

**(1) लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व :**

(१) संविधानकारांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरुवातीपासूनच स्त्री-पुरुष समानतेचे धोरण स्वीकारून दोहोंनाही समान राजकीय अधिकार प्रदान केले.

(२) त्यामुळे १९५२ च्या पहिल्या लोकसभेत २२ महिला निवडून आल्या होत्या. पुढे ही संख्या वाढत जाऊन २०१९ च्या निवडणुकीत ती ७६वर जाऊन पोहोचली आहे.

(३) लोकसभेच्या एकूण जागांच्या ५०% जागा स्त्रियांसाठी राखून ठेवाव्यात, असे विधेयक संसदेच्या पटलावर मांडले गेले आहे.

(४) स्त्रियांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व वाढल्यास स्त्रियांवरील अन्याय दूर होईल आणि देशाच्या निर्णयप्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग वाढेल.

**(2) प्रादेशिकता :**

(१) भारतात विविध भाषा बोलणारे, विविध परंपरा आणि संस्कृती असणारे लोक राहतात.


(२) भौगोलिक विविधतेबरोबरच साहित्य, शिक्षण, इतिहास, चळवळी यांबाबतीतही भारतात विविधता आढळते.

(३) प्रत्येकालाच आपली भाषा, परंपरा, संस्कृती यांच्याविषयी आत्मीयता वाटते. या आत्मीयतेतूनच वरील सर्वांबाबत अस्मिता निर्माण होते.


(४) आपल्या भाषेच्या, प्रदेशाच्या विकासाला लोक प्राधान्य देऊ लागतात. यालाच 'प्रादेशिकता' असे म्हणतात.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** निवडणूक आयोग पुढील कार्ये करतो—

(१) मतदार याद्या तयार करण्याचे व त्या अद्ययावत करण्याचे काम करणे.

(२) निवडणुकांचे वेळापत्रक आणि निवडणुकीची प्रक्रिया यांचे नियोजन करणे.

(३) उमेदवारांच्या अर्जांची छाननी करणे.

(४) निवडणुका घेणे व त्यासंबंधीची सर्व कामे करणे.

(५) राजकीय पक्षांना मान्यता देणे वा मान्यता रद्द करणे.

(६) निवडणुकीसंबंधातील सर्व वाद वा तक्रारींचे निवारण करणे.

**(टीप :** *उत्तरात किमान कोणतेही चार मुद्दे लिहिणे आवश्यक आहे.*)

**(2)** (१) पर्यावरणाचा ऱ्हास ही केवळ भारताचीच नव्हे; तर जागतिक समस्या बनली आहे.

(२) पर्यावरणाचा ऱ्हास थांबवावा आणि शाश्वत विकासाकडे जगाची वाटचाल व्हावी यासाठी पॅरिस, रिओ अशा ठिकाणी जागतिक पर्यावरण परिषदा घेतल्या गेल्या.

(३) भारतातही पर्यावरणातील विविध घटकांच्या सुधारणेसाठी अनेक चळवळी सक्रिय आहेत.

(४) 'चिपको'सारखे वृक्षसंवर्धन व संरक्षणासाठीचे आंदोलन, 'नमामि गंगे' सारखे नदी शुद्धीकरण आंदोलन, हरितक्रांती, जैवविविधतेचे संरक्षण यांसारख्या अनेक आंदोलनांनी व चळवळींनी पर्यावरण रक्षणाचे फार मोठे कार्य केले आहे.